नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ७४ Issue - 74 | वार - शुक्रवार दि. ७ ऑगस्ट २०२६ Blow- Friday Date 7 AUGUST 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मराठा जात प्रमाणपत्र रद्द प्रकरणावर सरकार अलर्ट!

## 'जाणीवपूर्वक गैरप्रकार आढळल्यास कारवाई करू' : राधाकृष्ण विखे-पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

संगमनेर : मराठा जात प्रमाणपत्र रद्द झाल्याच्या काही घटनांवरून सुरू झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. जात प्रमाणपत्र रद्द होण्याच्या प्रकरणांची वस्तुस्थिती तपासण्याच्या सूचना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

जात पडताळणी समिती ही घटनात्मक संस्था असल्याने तिच्या कामकाजात त्रुटी राहणार नाहीत, असा विश्वास व्यक्त करत विखे-पाटील म्हणाले, जाणीवपूर्वक काही गैरप्रकार झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील यांनी जात प्रमाणपत्र रद्द होण्याच्या घटनांबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तर देताना विखे-पाटील म्हणाले की, जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने सुरू आहे. तालुका स्तरावरील समित्यांना यापूर्वीच मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, जिल्हा स्तरावरील जात पडताळणी समिती घटनात्मक असतानाही काही प्रमाणपत्रे नाकारण्यात का आली, याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून सविस्तर अहवाल मागवण्यात आला आहे. एखादी घटना अपवादात्मक असेल तर त्याची कारणमीमांसा केली जाईल. मात्र, जाणीवपूर्वक कोणावरही अन्याय केला जात नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विखे-पाटील यांनी सांगितले की, निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्यासोबतही याबाबत चर्चा झाली असून, मनोज जरांगे-पाटील यांच्याशी संवाद साधण्याची सरकारची तयारी आहे. ते म्हणाले, मराठा समाजावर अन्याय केला जातो, हा जरांगे-पाटीलांचा गैरसमज आहे. सरकार आणि मराठा आरक्षण उपसमितीसमोर



त्यांनी मांडलेल्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेहमीच सकारात्मक भूमिका घेत आहेत. जरांगे-पाटील यांचा रोष समजून घेता येतो, मात्र वस्तुस्थिती समोर आल्यानंतर त्यांचे गैरसमज दूर होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाबाबत बोलताना विखे-पाटील म्हणाले की, मनोज जरांगे-पाटील हे मराठा समाजासाठी निस्वार्थपणे काम करत आहेत. यापूर्वी झालेल्या त्यांच्या आंदोलनांमध्ये आपण स्वतः त्यांच्याशी चर्चा केली असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळातही मराठा आरक्षणाबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेले मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयापर्यंत टिकले, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे सरकारवरही निशाणा साधत, त्यांच्या कार्यकाळात मराठा आरक्षण रद्द झाल्याचे म्हटले.

जात प्रमाणपत्र रद्द झाल्याच्या दोन-तीन घटना समोर आल्या असून त्याची निश्चित चौकशी केली जाईल, असे विखे-पाटील यांनी सांगितले. मात्र, या घटनांमुळे इतर पात्र लाभार्थ्यांवर कोणताही परिणाम होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. मराठा आरक्षण आणि जात प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावर सरकारकडून आता अधिक लक्ष ठेवले जात असून, पुढील काळात या प्रकरणांबाबत काय निर्णय घेतले जातात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्रात पुढील ३ दिवस मुसळधार पावसाचा इशारा


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम असून पुढील तीन दिवस काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषतः मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर, कोकण आणि मराठवाड्यात नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ७ ऑगस्ट रोजी मध्य महाराष्ट्रातील घाट भागात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. तसेच कोकण आणि गोव्यातही काही भागांमध्ये जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. (थशरींहशी णविरींश) मुंबई आणि उपनगरांमध्ये आज दिवसभर आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. शहराचे कमाल तापमान सुमारे ३० अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २५ अंश सेल्सिअस राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**घाट परिसर, कोकण आणि मराठवाड्यात सतर्कतेचे आवाहन**

८ ऑगस्ट रोजी उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. या भागात ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचाही अंदाज आहे. ९ ऑगस्टलाही या भागांमध्ये अशाच प्रकारचे हवामान कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. (चींलरळ ठळप) दरम्यान, राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागानेही पावसाच्या पार्श्वभूमीवर सतर्कतेचा इशारा दिला आहे. जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून एकूण १,६९८ अलर्ट जारी करण्यात आले आहेत. याशिवाय वीज पडणे, अतिवृष्टी आणि भूस्खलनासंदर्भात २८५ विशेष इशारे देण्यात आले आहेत. हवामान खात्याकडून मिळणाऱ्या पूर्वसूचना आणि रिअल-टाइम अलर्टच्या आधारे स्थानिक प्रशासनाला वेळोवेळी सूचना दिल्या जात आहेत. तसेच नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पूर आणि अतिवृष्टीचा धोका लक्षात घेऊन राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांची मिळून २३ पथके राज्यातील संवेदनशील भागांमध्ये तैनात करण्यात आली आहेत. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत आणि बचावकार्य करण्यासाठी ही पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत.



दैनिक यश सिद्धी न्यूज संपादक कमलाकर सोनकांबळे यांनी पंचायत समिती अक्कलकोटचे उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसा निमित्त शुभेच्छा दिल्या.

# भाजपविरोधात अभिजीत दिपकेंचा मोठा निर्णय; सीजेपी आता 'क्या बोलती पब्लिक' कॅम्पेन राबवणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर: केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देण्यास भाग पाडत सरकारला नमवल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीने आता आपल्या आगामी देशव्यापी रणनीतीची घोषणा केली आहे. आमचा लढा केवळ एका राजीनाम्यापुरता मर्यादित नव्हता. येत्या सप्टेंबर महिन्यापासून उगझ देशभरात 'क्या बोलती पब्लिक' ही विशेष मोहीम राबवून देशातील ६० टक्के तरुणांचे प्रश्न थेट केंद्रस्थानी आणणार आहे, अशी माहिती उगझ चे प्रमुख अभिजीत दीपके यांनी दिली आहे.

पुढील आंदोलनाची आणि संघटनात्मक बांधणीची आखणी करताना उगझ ने 'जॉईन द मुव्हमेंट, जॉईन उगझ' हे नवे अभियान लॉन्च केले आहे. उगझ चे नेते सौरभ दास यांनी पत्रकार परिषदेत अधिकृत 'क्यूआर कोड' जारी करत, देशातील जास्तीत जास्त तरुणांना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले. आम्ही राजकीय पक्ष काढणार नसून, सरकारवर व राजकीय पक्षांवर सतत दबाव आणणारा 'पब्लिक प्रेशर ग्रुप' म्हणून गल्लीपासून दिल्लीपर्यंत काम करणार आहोत, असं त्यांनी स्पष्ट केले.

५ झोनमध्ये देशव्यापी संघटन; क्राउड फंडिंगचा निर्णय

उगझ च्या नव्या रणनीतीनुसार संपूर्ण देशाची ५ मुख्य भागांत विभागणी करून संघटन बांधणी केली जाणार आहे.



आशुतोष रांका यांनी दिलेल्या माहितीनुसार, रत्ना सिंग यांच्याकडे कायदेशीर बाबींची जबाबदारी असेल, तर वैष्णवी गौर या धोरणात्मक निर्णय निश्चित करतील.

आंदोलनासाठी लागणारा निधी हा कुठल्या बड्या राजकीय पक्षाकडून किंवा उद्योजकाकडून न घेता जनतेच्या सहभागातून गोळा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय उगझ ने घेतला आहे.शिक्षणधंदा अन् बेरोजगारीविरुद्ध गावागावात लढासप्टेंबर महिन्यात 'क्या बोलती पब्लिक' मोहिमेत उगझ ची टीम देशातील विविध राज्यांत आणि गावांत फिरून तरुणांशी संवाद साधणार आहे. पहिली-दुसरीच्या मुलांची १-१ लाख रुपये फी, कॉलेजेसमध्ये २५ लाख रुपयांचा मॅनेजमेंट कोटा आणि पदव्या हातात असूनही डिलिव्हरी बॉय म्हणून काम करण्याची तरुणांची मजबुरी... या शिक्षणधंद्याविरोधात अन् बेरोजगारीविरोधात उगझ आता थेट रस्त्यावर उतरून मोठा दबाव निर्माण करेल, असा थेट इशारा अभिजीत दीपके यांनी दिला आहे.

शिक्षणधंदा अन् बेरोजगारीविरुद्ध गावागावात लढा

सप्टेंबर महिन्यात 'क्या बोलती पब्लिक' मोहिमेत उगझ ची टीम देशातील विविध राज्यांत आणि गावांत फिरून तरुणांशी संवाद साधणार आहे. पहिली-दुसरीच्या मुलांची १-१ लाख रुपये फी, कॉलेजेसमध्ये २५ लाख रुपयांचा मॅनेजमेंट कोटा आणि पदव्या हातात असूनही डिलिव्हरी बॉय म्हणून काम करण्याची तरुणांची मजबुरी... या शिक्षणधंद्याविरोधात अन् बेरोजगारीविरोधात उगझ आता थेट रस्त्यावर उतरून मोठा दबाव निर्माण करेल, असा थेट इशारा अभिजीत दीपके यांनी दिला आहे.

**सरसंघचालक डॉ. मोहन भागवत; लोकशाहीत आंदोलनसुद्धा संवादाचेच एक माध्यम**

# 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा' जुन्या पिढीपेक्षा अधिक प्रामाणिक!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारताच्या शिक्षणव्यवस्थेत अजूनही अनेक सुधारणा करण्याची गरज असून, त्या अपेक्षित वेगाने होत नसल्यामुळे असंतोष निर्माण होत आहे. मात्र, लोकशाहीत संवाद हाच सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्याचा मुख्य मार्ग आहे. नीट परीक्षा गोंधळाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावर उतरलेली आजची 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा' ही नवी पिढी विरोधासाठी विरोध करत नसून, त्यांच्या तक्रारी आणि नाराजी खऱ्या आहेत. ही पिढी आमच्या पिढीपेक्षा अधिक प्रामाणिक, तर्कसंगत उत्तरे मागणारी आणि देशभक्त आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी गुरुवारी केले. त्याचवेळी सरकारकडून 'जेन-झी'सोबत संवादाला विलंब झाल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

'इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनायटेड नेशन्स' या संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित वार्षिक चॅम्पियनशिप परिषदेत ते बोलत होते. देशभरातील १०० हून अधिक शहरांमधील १५ ते १९ वयोगटातील दोन हजारांपेक्षा जास्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी त्यांनी या वेळी संवाद साधला. आपल्या संवादादरम्यान सरसंघचालकांनी शिक्षण व्यवस्था, आंदोलनाचे स्वरूप, लोकशाहीतील संवादाचे महत्त्व, एलजीबीटीक्यू समुदाय, महिलांचा सहभाग, पर्यावरण, बेरोजगारी आणि आरक्षण अशा विविध विषयांवर सविस्तर भूमिका मांडली.

आम्ही लहान असताना मोठ्यांनी सांगितलेले प्रश्न न विचारता मान्य करायचो. मात्र, आजची तरुण पिढी प्रश्न विचारते; त्यांना तर्कसंगत उत्तरासोबतच आपुलकीही हवी असते, असे सांगत भागवत यांनी तरुणाईच्या भूमिकेचे समर्थन केले. जेन-झी किंवा जेन-अल्फा पिढीने आंदोलन करू नये, असे म्हणणे अयोग्य आहे. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणांमधून लोकशाहीत आपले प्रश्न मांडण्याचे मार्ग स्पष्ट मिळतात. शिक्षण क्षेत्रातील आंदोलने ही व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी असावीत, कोणा एकाच्या विरोधासाठी नाही. प्रश्न एवढा टोकाला जाण्यापूर्वीच संवाद सुरू झाला असता, तर अशी वेळ आली नसती. जेव्हा एखादा विषय एवढा ताणला जातो, तेव्हा यंत्रणेत कुठेतरी चूक किंवा उणीव राहिली आहे हे मान्य करावेच लागते, असे



परखड मतही त्यांनी व्यक्त केले.

सरसंघचालक म्हणाले, लोकशाहीत ज्याला इंग्रजीत 'डिबेट' म्हणतात, त्याला आपल्या परंपरेत 'शास्त्रार्थ' म्हणतात. शास्त्रार्थात पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष अशा सर्व बाजूंचा विचार करून सत्याचा शोध घेतला जातो. विविध आणि परस्परविरोधी मते एकत्र आल्यावरच सत्याचे व्यापक चित्र स्पष्ट होते. त्यामुळे अशा संवादाची लोकशाहीत अत्यंत गरज आहे. आंदोलन करणाऱ्या तरुणांना एखाद्या देशाचे 'एजंट' किंवा तत्सम विशेषणे लावणे पूर्णपणे चुकीचे आहे. ती आपलीच मुले असून देशाची भावी पिढी आहे. आंदोलनादरम्यान निरपराध तरुणांवर लाठीमार किंवा पेलेट गनचा वापर होण्याच्या घटनांबद्दल बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, याप्रकरणी पुरेशी खात्रीशीर माहिती नसताना निष्कर्ष काढणे अयोग्य आहे. काही विघातक घटकांनी यात शिरकाव केल्याच्या बातम्या मी वाचल्या असल्या, तरी मला जर कोणावर विश्वास ठेवायचा असेल तर मी माझ्या देशाच्या 'जेन-झी' तरुणांवरच विश्वास ठेवेन, असेही त्यांनी सांगितले.

शिक्षणाच्या व्यापारीकरणावर चिंता व्यक्त करत डॉ. भागवत म्हणाले, शिक्षण हा व्यवसाय नसून ती जीवनाची मूलभूत गरज आहे. त्यामुळे ते सर्वसामान्यांना सहज परवडणारे आणि उपलब्ध होणारे असले पाहिजे. शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सरकारवर टाकून चालणार नाही, ती समाजाचीही संयुक्त जबाबदारी आहे. अनेक गावकऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन दानशूर व्यक्तींच्या मदतीने शाळांचा कायापालट केला आहे. शिक्षणाचा सर्व आर्थिक भार सरकारवर टाकण्याऐवजी समाजानेही यात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे.

चीन, पाकिस्तानसोबतचे संबंध कायमचे तोडणे अयोग्य

डॉ. भागवत म्हणाले, चीन आणि पाकिस्तानशी संघर्षाच्या काळात देश, सैन्य आणि सरकारच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे. मात्र, म्हणून दोन्ही देशांतील लोकांचे एकमेकांशी असलेले जुने संबंध कायमचे संपवले पाहिजेत असे नाही. चीनमधील लोकही मानतात की भारताने त्यांना दोन हजार वर्षांपूर्वी जीवनमूल्ये दिली, तर पाकिस्तान शंभर वर्षांपूर्वी भारताचाच एक भाग होता. संघर्ष सुरू असेपर्यंत संबंध तात्पुरते स्थगित राहू शकतात; पण ते कायमचे तुटणे हे भारताच्या परंपरेत बसत नाही. भारताची संस्कृती ही इतरांवर विजय मिळवण्याची किंवा नाश करण्याची नसून सुसंवाद साधण्याची आहे. युद्ध किंवा तणाव हे राजकारणामुळे निर्माण होतात. प्रत्येक पाकिस्तानी हा भारतीयांचा शत्रू नाही. त्यामुळे संघर्ष थांबल्यानंतर थांबलेला संवाद पुन्हा सुरू करण्याची आपली तयारी असली पाहिजे, कारण अखेरीस संपूर्ण मानवजात एकच आहे.

## संपादकीय....

# अतिवृष्टीचा धोका

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम असून पुढील तीन दिवस काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषतः मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर, कोकण आणि मराठवाड्यात नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ७ ऑगस्ट रोजी मध्य महाराष्ट्रातील घाट भागात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. तसेच कोकण आणि गोव्यातही काही भागांमध्ये जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. (थशरींहशी णविरींश) मुंबई आणि उप-नगरांमध्ये आज दिवसभर आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. शहराचे कमाल तापमान सुमारे ३० अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २५ अंश सेल्सिअस राहण्याचा अंदाज आहे. वीज पडणे, अतिवृष्टी आणि भूस्खलनासंदर्भात २८५ विशेष इशारे देण्यात आले आहेत. हवामान खात्याकडून मिळणाऱ्या पूर्वसूचना आणि रिअल-टाइम अलर्टच्या आधारे स्थानिक प्रशासनाला वेळोवेळी सूचना दिल्या जात आहेत.

# रस्त्याची दुरावस्था : नागरिकांना करावा लागतो खड्ड्यातून प्रवास



वागदरी : वागदरी येथील आंबेडकर चौका पासून ते हिरा-ळी कर्नाटक बॉर्डर पर्यंतचा रस्ता अतिशय खराब झालेला आहे व रस्त्यावर खूप मोठमोठे गुडघ्या इतके खड्डे पडलेले आहेत त्या खड्ड्यात पावसाचे पाणी साचून रस्ता दिसत नसल्यामुळे अपघात होत आहेत. सदरील रस्ता चार महिन्याच्या पलीकडे पॅचवर्क करून घेतलेला असून तो अतिशय निकृष्ट दर्जाचा करण्यात आलेला आहे. पाऊस नसतानाही रस्त्याची खूप मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. व संपूर्ण रस्ता उकसलेला आहे. रस्त्यावर खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता आहे अशी अवस्था या रोडचे झा-लेले आहे तरी हा रस्ता वागदरी पासून कर्नाटक आळंद गुलबर्गा कडे जाण्याचा राष्ट्रीय महामार्ग आहे. वागदरी कडे येत असताना सदर रस्ता उतार असल्याने जवळ आल्याशिवाय खड्डे दिसत नाहीत कित्येक मोटर सायकल स्वार त्या खड्ड्यामध्ये पडून जखमी झालेले आहेत. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभाग व संबंधित प्रशासनाने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना सुरक्षित व सुखकर वाहतुकीची सुवधा उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी स्थानिक नागरिकाकडून होत आहे.


# पैठणी साडी : हातमाग परंपरेची वारसा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारत हा विविध कला, संस्कृती, परंपरा आणि लोककौशल्यांनी समृद्ध असलेला देश आहे. भारतीय संस्कृतीच्या या वैभवशाली परंपरेमध्ये वस्त्रकलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. देशातील विविध भागांमध्ये विकसित झालेल्या पारंपरिक वस्त्रप्रकारांनी भारतीय संस्कृतीची ओळख जगभर निर्माण केली आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असलेली पैठणी साडी ही विशेष उल्लेखनीय आहे. पैठणी ही केवळ एक साडी नसून ती महाराष्ट्राच्या इतिहासाची, कलात्मकतेची, परंपरेची आणि कुशल कारागिरांच्या अथक श्रमांची जिवंत साक्ष आहे. ७ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त पैठणीसारख्या पारंपरिक हातमाग उत्पादनांचा गौरव करणे म्हणजे भारतीय कला, कौशल्य आणि श्रमसंस्कृतीचा सन्मान करणे होय. पैठणीच्या प्रत्येक धाग्यामध्ये महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास, सौंदर्यदृष्टी आणि कारागिरांच्या पिढ्यान् पिढ्या जपलेल्या कौशल्याचा अनमोल ठेवा सामावलेला आहे.

पैठणीचा इतिहास अत्यंत प्राचीन आणि गौरवशाली आहे. महाराष्ट्रातील गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या प्राचीन पैठण नगरीच्या नावावरून या साडीला 'पैठणी' हे नाव प्राप्त झाले. सातवाहन काळापासून पैठण हे व्यापार, संस्कृती आणि कलांचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. प्राचीन काळात पैठण येथून तयार होणाऱ्या उत्कृष्ट दर्जाच्या वस्त्रांची देश-विदेशात मोठ्या प्रमाणावर मागणी होती. भारतीय रेशीम आणि सूती वस्त्रांच्या व्यापारात पैठणचे महत्त्वपूर्ण स्थान होते. रोमन साम्राज्याशी भारताचा व्यापार सुरू असताना पैठण परिसरातील वस्त्रांना मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. त्यामुळे पैठणीचा इतिहास हा केवळ एका साडीचा इतिहास नसून महाराष्ट्राच्या प्राचीन व्यापार, कला आणि सांस्कृतिक समृद्धीचा इतिहास आहे.

पैठणी निर्मिती ही अत्यंत कौशल्यपूर्ण आणि संयमाची प्रक्रिया आहे. पारंपरिक पद्धतीने पैठणी तयार करण्यासाठी उच्च प्रतीच्या रेशमी धाग्यांचा वापर केला जातो. धाग्यांना विशिष्ट पद्धतीने रंग देणे, त्यांची योग्य मांडणी करणे, हातमागावर विणकाम करणे आणि नक्षीकाम साकार करणे यासाठी विणकरांना मोठे कौशल्य आवश्यक असते. एक उत्कृष्ट पैठणी तयार करण्यासाठी अनेक दिवस, कधी कधी अनेक महिने लागतात. विणकर आपल्या अनुभव, कल्पकता आणि कलात्मक दृष्टीच्या साहाय्याने प्रत्येक पैठणीला एक वेगळे रूप देतात. त्यामुळे प्रत्येक पैठणी ही एक स्वतंत्र कलाकृती मानली जाते. मशीनवर तयार होणाऱ्या वस्त्रांपेक्षा हाताने विणलेल्या पैठणीचे महत्त्व याच कारणामुळे अधिक आहे.



पैठणीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची आकर्षक रंगसंगती आणि वैशिष्ट्यपूर्ण नक्षीकाम. पारंपरिक पैठणीमध्ये मोर, कमळ, आंबी, नारळी, अश्रफी, वेलबुट्टी आणि विविध प्रकारच्या पारंपरिक आकृत्यांचा वापर केला जातो. पैठणीच्या पदरावर विणले जाणारे मोराचे चित्र हे तिची खास ओळख मानले जाते. भारतीय संस्कृतीमध्ये मोर हा सौंदर्य, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानला जा-तो. त्यामुळे पैठणीच्या पदरावरील मोराची नक्षी विशेष आकर्षण निर्माण करते. सोन्या-चांदीच्या झरीचा वापर, रेशमी धाग्यांची चमक आणि रंगांची सुंदर सांगड यामुळे पैठणीला राजेशाही स्वरूप प्राप्त होते.

महाराष्ट्रातील स्त्रियांच्या भावविश्वात पैठणीला अत्यंत मानाचे स्थान आहे. लग्नसमारंभ, सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि विशेष प्रसंगी पैठणी परिधान करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून चालत आली आहे. मुलीच्या विवाहाच्या वेळी माहेरकडून दिली जाणारी पैठणी ही प्रेम, आशीर्वाद आणि सन्मानाचे प्रतीक मानली जाते. अनेक कुटुंबांमध्ये आजी-आईकडून पुढील पिढीकडे पैठणी जपून ठेवण्याची परंपरा आहे. त्यामुळे पैठणी ही केवळ वस्त्र राहत नाही, तर ती कुटुंबाच्या आठवणी, भावना आणि सांस्कृतिक वारशाचा भाग बनते.

पैठणीच्या विकासामध्ये महाराष्ट्रातील विविध राजवटींचे योगदान राहिले आहे. सातवाहन काळापासून सुरू झालेली ही वस्त्रपरंपरा पुढे यादव, बहमनी, निजाम आणि मराठा काळात अधिक विकसित झाली. राजघराण्यांमध्ये पैठणीचा वापर प्रतिष्ठेचे आणि वैभवाचे प्रतीक म्हणून केला जात असे. विशेषतः मराठा काळात पैठणीला मोठा राजाश्रय मिळाला. दरबारातील स्त्रिया आणि उच्चवर्गीय समाजामध्ये पैठणीला विशेष स्थान होते. विविध राजवटींच्या प्रभावामुळे पैठणीच्या डिझाइनमध्ये, रंगांमध्ये आणि नक्षीकामामध्ये विविधता निर्माण झाली. या ऐतिहासिक प्रवास-ातून पैठणीने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

पैठणीच्या निर्मितीमध्ये विणकर समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक विणकर कुटुंबांनी पिढ्यान् पिढ्या या कलेचे जतन केले आहे. त्यांच्या हातातील कौशल्यामुळेच पैठणीसारखी अप्रतिम कलाकृती आजही अस्तित्वात आहे. मात्र, या पारंपरिक कलेमागे असलेल्या विणकरांच्या समस्या अनेकदा दुर्लक्षित राहतात. मोठ्या मेहनतीनंतर तयार होणाऱ्या पैठणीला योग्य बाजारभाव मिळणे, कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, आर्थिक अडचणी आणि बदलत्या बाजारपेठेतील स्पर्धा या समस्या विणकरांसमोर आहेत. त्यामुळे पैठणीच्या संवर्धनाबरोबरच पैठणी विणणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

आधुनिक काळात पैठणीसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. यंत्रमागावर तयार होणाऱ्या स्वस्त साड्यांमुळे पारंपरिक हातमाग पैठणीला स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे. अनेकदा बनावट किंवा कमी दर्जाच्या साड्यांना पैठणी म्हणून विकले जाते, त्यामुळे ग्राहकांची फसवणूक होते आणि अस्सल पैठणी तयार करणाऱ्या कारागिरांचे नुकसान होते. अस्सल पैठणीची ओळख, तिची गुणवत्ता आणि पारंपरिक वैशिष्ट्ये याबाबत ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. पैठणीसारख्या पारंपरिक वस्त्रांचे संरक्षण करण्यासाठी शासन, समाज आणि ग्राहक यांनी संयुक्त प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पैठणीच्या संवर्धनासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. पैठणीला भौगोलिक मानांकन मिळाल्यामुळे तिची स्वतंत्र ओळख अधिक मजबूत झाली आहे. विविध प्रदर्शनांमधून, सांस्कृतिक महोत्सवांमधून आणि डिजिटल माध्यमांद्वारे पैठणी देश-विदेशातील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहे. आज अनेक विणकर आणि उद्योजक ऑनलाइन माध्यमांचा वापर करून थेट ग्राहकांशी संपर्क साधत आ-हेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे पारंपरिक कलेला आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होत आहे. यामुळे पैठणी उद्योगाला नव्या संधी निर्माण होत आहेत.

बदलत्या काळानुसार पैठणीने आधुनिकतेशीही जुळवून घेतले आहे. पारंपरिक नक्षी आणि रंगसंगती जपत नवीन डिझाइन, विविध प्रकारचे रंग आणि आधुनिक फॅशनच्या गरजेनुसार पैठणीमध्ये प्रयोग केले जात आहेत. अनेक फॅशन डिझायनर्सनी पैठणीला आधुनिक पोशाखांमध्ये स्थान दिले आहे. त्यामुळे तरुण पिढीमध्येही पैठणीविषयी आकर्षण वाढत आहे. भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय फॅशन क्षेत्रात पैठणीला मिळणारी प्रसिद्धी ही तिच्या बदलत्या काळाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेचे उदाहरण आहे.

पैठणी ही पर्यावरणपूरक जीवनशैलीचेही प्रतीक आहे. हातमागावर तयार होणाऱ्या या साडीच्या निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणावर मानवी कौशल्याचा वापर केला जा-तो. यंत्राधारित मोठ्या प्रमाणातील उत्पादनाच्या तुलनेत हातमाग उद्योग पर्यावरणासाठी अधिक अनुकूल आहे. आज जगभरात शाश्वत फॅशन आणि पर्यावरणपूरक उत्पादनांना महत्त्व दिले जात आहे. या पार्श्वभूमीवर पैठणीसारख्या पारंपरिक हातमाग वस्त्रांचे महत्त्व अधिक वाढले आहे.

राष्ट्रीय हातमाग दिन हा भारतीय हातमाग परंपरेचा गौरव करण्याचा दिवस आहे. या दिवशी पैठणीसारख्या पारंपरिक वस्त्रांचा सन्मान करणे म्हणजे केवळ एका साडीचा गौरव करणे नव्हे, तर तिच्यामागील हजारो वर्षांच्या परंपरेचा, असंख्य विणकरांच्या श्रमांचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सन्मान करणे होय. पैठणीच्या प्रत्येक धाग्यामध्ये महाराष्ट्राचा इतिहास, कला आणि संस्कृती विणलेली आहे. त्यामुळे या वारशाचे संरक्षण करणे, विणकरांना प्रोत्साहन देणे आणि अस्सल हातमाग उत्पादनांचा स्वीकार करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

पैठणी ही महाराष्ट्राची ओळख आहे, अभिमान आहे आणि सांस्कृतिक संपत्ती आहे. तिच्या रेशमी धाग्यांमध्ये केवळ सौंदर्य नाही, तर परंपरा, श्रम, भावना आणि इतिहासाचा संगम आहे. राष्ट्रीय हातमाग दिनाच्या निमित्ताने आपण पैठणीसारख्या अमूल्य वारशाचे जतन करण्याचा आणि या कलेला पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला पाहिजे. कारण पैठणीचा प्रत्येक धागा हा केवळ साडीचा भाग नसून महाराष्ट्राच्या गौरवशाली संस्कृतीचा एक अमूल्य धागा आहे.



**– सुजाता मोरे, (लेखिका, पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत)**
**ईमेल – sujata.more2103@gmail.com**

# 'न समजलेले आई-बाप समजून घेताना' बार्शीतील एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सुप्रसिद्ध वक्ते वसंत हंकारे यांचे व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बार्शी : वेगाने बदलणारी जीवनशैली, मोबाईल आणि सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, करिअरची स्पर्धा, मानसिक तणाव आणि कमी होत चाललेला कौटुंबिक संवाद यामुळे आज पालक आणि मुलांमधील नातेसंबंध अनेकदा तणावपूर्ण होताना दिसतात. एकाच घरात राहूनही संवादाचा अभाव, गैरसमज आणि भावनिक दुरावा वाढत असल्याची चिंता समाजात व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत एकमेकांना समजून घेणे, विश्वासाचे नाते निर्माण करणे आणि कुटुंबातील संवाद अधिक सुदृढ करणे ही काळाची गरज बनली आहे. याच सामाजिक जाणिवेतून बार्शीतील एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्च'च्या वतीने 'न समजलेले आई-बाप समजून घेताना' या अत्यंत संवेदनशील आणि समाजप्रबोधनात्मक विषयावर व्याख्यानाचे आयोजन शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता करण्यात आले आहे.

माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव स्वाती कराड चाटे यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शिका प्रा. प्रभा कासलीवाल व प्राचार्य डॉ. मधुकर लंगेरे यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंग कॅम्पसमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमात आपल्या प्रभावी व विचारप्रवर्तक शैलीसाठी प्रसिद्ध असलेले वक्ते वसंत हंकारे पालक आणि मुला-मुलींमधील नातेसंबंध अधिक दृढ करणे, परस्पर संवाद वाढविणे आणि कौटुंबिक मूल्यांचे महत्त्व आदी विषयावर विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी व पालकांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शनिवार, दि. ०८ ऑगस्ट २०२६, वेळ : सायंकाळी ५:३० वाजता, स्थळ : एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्च, इंडस्ट्रियल इस्टेट क्र. ३, बार्शी,

अधिक माहितीसाठी संपर्क : ८४५९९६७८८२

# प्रथम वर्ष इंजिनिअरिंग व एम.बी.ए. प्रवेशासाठी कॅप राऊंड-२ चे ऑप्शन्स फॉर्म भरण्याची प्रक्रिया दि.७ ऑगस्ट पासून सुरू

स्वेरीकडून विविध ठिकाणी ही सुविधा मोफत उपलब्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः 'शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्ष इंजिनिअरिंग व एम.बी.ए प्रवेशाची द्वितीय फेरी (सेकंड कॅप राऊंड)चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ पासून ते सोमवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ पर्यंत म्हणजेच एकूण तीन दिवस चालणार आहे. या कालावधीत स्वेरी अभियांत्रिकीच्या स्क्रूटीनी सेंटर (एस.सी.क्रमांक ६२२०) मध्ये ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय करण्यात आली आहे. ज्यांनी प्रथम वर्ष इंजिनिअरिंग किंवा प्रथम वर्ष एम.बी.ए प्रवेशासाठी कॅप रजिस्ट्रेशन, डॉक्युमेंट्स व्हेरिफिकेशन आणि कन्फर्मेशन केले आहे तसेच प्रथम प्रवेश फेरीत बेटरमेंट केले आहे अथवा प्रथम प्रवेश फेरीत ज्यांना सीट अलॉट झालेली नाही अशा विद्यार्थ्यांना या प्रवेश फेरीचा लाभ घेता येईल.' अशी माहीती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.



सन २०२६-२७ मध्ये प्रथम वर्ष इंजिनिअरिंग किंवा प्रथम वर्ष एम.बी.ए प्रवेशासाठीच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी व निश्चिती करणे आदी प्रक्रिया पूर्वीच पूर्ण झालेल्या आ-हेत. या द्वितीय फेरीमध्ये योग्य आणि पसंतीचे महाविद्यालय अथवा प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या योग्य ब्रँच बाबतचे पसंतीक्रम ऑनलाईन भरावे लागणार आहेत. यासाठी विद्यार्थी व पालकांनी पूर्णपणे अभ्यास करून कॅप राऊंड-२ चे ऑप्शन फॉर्म भरणे अत्यंत गरजेचे आहे. शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ पासून ते सोमवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत स्वेरीमार्फत मोहोळ, आटपाडी, अनगर, मंगळवेढा, सांगोला, करकंब, कुर्डूवाडी, सोलापूर, माढा, अकलूज, टेंभुर्णी, बार्शी, धाराशिव, लोहारा या ठिकाणी प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंग व प्रथम वर्ष एम.बी.ए प्रवेशासाठीच्या कॅप राऊंड-२ चे ऑप्शन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर ठिकाणी स्वेरीचे तज्ञ प्राध्यापक व त्यांचे सहकारी उपस्थित असणार आहेत. त्यांचे संपर्क क्रमांक विद्यार्थी व पालकांपर्यंत लवकरच पोहचवले जातील तरी पालक व विद्यार्थ्यांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा.' असे आवाहन करण्यात आले आहे. महाविद्यालय निवडताना महाविद्यालयात दरवर्षी होणारे प्रवेश, विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंटची संख्या, वसतिगृह सुविधा, इतर सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग, संशोधने, मानांकने या महत्वाच्या बाबींचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या व प्रथम वर्ष एम.बी.ए च्या दुसर्या प्रवेश फेरीची अलॉटमेंट यादी अधिकृत संकेतस्थळावर बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे. दुसर्या फेरीच्या जागावाटपानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरून प्रवेशाची निश्चिती करावी लागणार आहे. प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.उत्तम अनुसे (९१६८६५५३६५), प्रा. पोपट आसबे (७८२१००४६४७) व प्रथम वर्ष एम.बी.ए प्रवेशासाठी प्रा. सागर सरीक (९८९०४ १९०४९) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तसेच महाविद्यालयास सातत्याने मिळत असलेल्या अभूतपूर्व यशाची पार्श्वभूमी, तसेच मिळालेला ऑटोनॉमस दर्जा यामुळे या दुसर्याही फेरीला विक्रमी गर्दी होणार आहे, हे मात्र निश्चित.

## ४ लाख ८७ हजार९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

## तिघांवर गुन्हा दाखल; पंढरपूर तालुका पोलीसांची कामगिरी

# पंढरपूरात अवैध गुटखा वाहतुकीवर पोलीस प्रशासनाची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : (दि.६) पंढरपूर तालुका पोलीसांनी लक्ष्मी टाकळी (ता.पंढरपूर) येथे सा-पळा रचून ८७ हजार ९०० रुपयांचा अवैध गुटखा व ४ लाख रुपयांची कार गाडी असा ४ लाख ८७ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना दि.६ ऑगस्ट रोजी घडली आहे. याबाबत तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत पंढरपूर तालुका पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्य पोलीस निरीक्षक शहाजी गोसावी यांच्या आदेशाने अवैध्य धंद्यावरती कारवाई करण्यात येत होती. पंढरपूर तालुका पोलीसांच्या पथकाने मिळालेल्या माहितीनुसार लक्ष्मी टाकळी (ता. पंढरपूर) येथील हॉटेल शाही दरबार जवळ सापळा रचला. एक मारुती सुजुकी कंपनीची चार चाकी गाडी( एम.एच.४५ ए.यु ६६४५) चेक केली असता गाडीच्या डिकीमध्ये व मधल्या सीटवर महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला पानमसाला (गुटखा) वाहतुक करताना मिळुन आला. चालक श्रीकांत राजेंद्र बळवंतराव (वय ३२) रा. सांगोला, तर गाडीतुन उतरून पळुन गेलेला संतोष चांगदेव सुरवसे रा. खारवाटवाडी सांगोला तर ज्याच्याकडून गुटखा आणला तो संतोष डोंगरे रा.इचलकरंजी जि. कोल्हापूर या तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोसई राजेंद्र गोसावी हे करित आहेत.

सदरची कारवाई अप्पर पोलीस अधिक्षक विजय कबाडे, सहाय्य पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोना बाबासाहेब पाटील, संतोष गायकवाड, पोकॉ विजयकुमार आवटे, मंगेश सुर्वे, सागर गवळी, सुरज देशमुख यांनी केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; पंढरपूर तालुक्यात ३२२४ शेतकऱ्यांना लाभ

## सहा. निबंधक सुनील तेलंगरे यांनी दिली माहिती; पात्र शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीचा लाभ घेण्याचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर केली या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात पंढरपूर तालुक्यातील ९७ गावातील ३२२४ पात्र थकबाकीदार लाभार्थी शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळाला असल्याची माहिती सहा. निबंधक सुनील तेलंगरे यांनी दिली.

राज्य शासनाने या योजनेद्वारे थकीत पीककर्ज असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंढरपूर तालुक्यात बँक ऑफ इंडिया ६९२,महाराष्ट्र ग्रामीण बँक ५८१, बँक ऑफ महाराष्ट्र ५५८,युनियन बँक ऑफ इंडिया ५०८, बँक ऑफ बडोदा १६९,स्टेट बँक ऑफ इंडिया १०९, सेंट्रल बँक ऑफ इंडिया ०२ अशा विविध राष्ट्रीयकृत तसेच सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ६०५ या बँकांद्वारे कर्ज घेतलेल्या पात्र ३ हजार २२४ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.

शेतकऱ्यांनी लाभ मिळवण्यासाठी ई-केवासी (आधार प्रमाणीकरण) करणे अनिवार्य आहे. आधार प्रमाणीकरण करण्यापूर्वी सर्व लाभार्थी शेतकऱ्यांनी आपले अग्रीस्टॅक फार्मर आयडी नोंदवणे किंवा तयार करणे आवश्यक आहे. यासाठी शेतकरी आपले आधार कार्ड व त्यावर लिंक असलेला मोबाईल क्रमांक घेऊन आपले सरकार सेवा केंद्र किंवा बँकेच्या शाखेत ई-केवायसी पूर्ण करू शकतात.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ पात्र शेतकऱ्याची पहिली यादी जाहीर करण्यात आली असून पंढरपूर तालुक्यातील ९७ गावातील ३२२४ पात्र शेतकऱ्यांची गावपातळीवर यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. लाभार्थी शेतकऱ्यांनी ई केवायसी करण्याकरता आपल्या जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करून घ्यावे व केंद्रावर कोणतेही शुल्क न देता विनामूल्य माहिती भरून पात्र शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा यासाठी कोणतेही शुल्क देऊ नये, असे आवाहन सहाय्यक निबंधक सुनील तेलंगरे यांनी केले आहे.

विशिष्ठ क्रमांकाचे यादीत नाव आलेल्या शेतक-यांना त्यांचे कर्ज खात्याबाबत तक्रार असल्यास त्यांना योजनेच्या पोर्टलवर ऑनलाईन तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असल्याची माहितीही सहाय्यक निबंधक सुनील तेलंगरे यांनी दिली.

---

# पंढरपुरात अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाला मंजुरी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्याचे कौतुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथे नवीन अपर पोलीस अधीक्षक कार्यालयास राज्य शासनाने मंजुरी दिल्यानंतर पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार आवताडे यांना पाठविलेल्या पत्रात त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे आणि मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या पुढाकाराचे विशेष कौतुक केले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रात नमूद केले आहे की, पंढरपूर हे देशभरातील लाखो वारकऱ्यांचे आणि भाविकांचे श्रद्धास्थान आहे. वर्षभर मोठ्या प्रमाणावर भाविक येथे येत असतात. यात्राकाळात वाढणारी गर्दी, वाहतूक व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पंढरपूर येथे अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाची आवश्यकता होती. या सर्व बाबींचा विचार करून राज्य शासनाने हे महत्त्वपूर्ण कार्यालय मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे.

पत्रात पुढे मुख्यमंत्री म्हणतात की, या कार्यालयासाठी आमदार समाधान आवताडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दाखविलेली तळमळ आणि प्रयत्न कौतुकास्पद आहेत. या निर्णयामुळे पंढरपूरसह

> **आरटीओ उप प्रादेशिक कार्यालय व महसूल अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासाठीही हालचाली; पंढरपूरकरांना मिळणार प्रशासकीय सेवांचा मोठा दिलासा**

मंगळवेढा, सांगोला, माळशिरस आणि परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम, जलद आणि परिणामकारक पोलीस सेवा उपलब्ध होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, आमदार समाधान आवताडे यांच्या पुढाकारातून पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालय तसेच महसूल विभागाचे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याची मागणीही शासनाकडे करण्यात आली आहे. या दोन्ही कार्यालयांबाबत सकारात्मक हालचाली सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

सध्या पंढरपूर, मंगळवेढा तसेच परिसरातील नागरिकांना वाहन नोंदणी, परवाना, वाहन हस्तांतरण, महसूलविषयक विविध प्रशासकीय कामांसाठी सोलापूर येथे जावे लागते. प्रस्तावित कार्यालयांना मंजुरी मिळाल्यानंतर ही सर्व कामे पंढरपूरमध्येच होणार असल्याने नागरिकांचा वेळ, खर्च आणि गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मंजुरीनंतर आता आरटीओ आणि महसूल अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांनाही लवकरच मंजुरी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत असून पंढरपूरला विभागीय स्तरावरील महत्त्वाच्या प्रशासकीय सुविधा उपलब्ध होण्याच्या दिशेने हा मोठा टप्पा मानला जात आहे. स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे.

---

# पुणे विभागीय शिक्षक मतदार संघात महायुतीमध्ये रस्सीखेच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुणे शिक्षक मतदार संघाच्या विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महा इती तेच उमेदवार यावरून सुरस होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. भाजपकडून विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी रोंगे (सर) मोर्चे बांधणी सुरू केली आहे. शिवसेना ( शिंदे गट) वैद्यकीय कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी तयारी सुरू केली आहे. सांगोला तालुक्याचे माजी आमदार राजू बापू पाटील यांनी मंगेश चिवटे यांच्या नावाची शिफारस केली आहे. असून माहितीमध्ये उमेदवारीसाठी प्रश्न ऐरणीवर येण्याची शक्यता आहे. पुणे विभागीय शिक्षक मतदार संघाच्या विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ डिसेंबर २०२६ संपत आहे त्यामुळे सध्या प्रशासनाकडून मतदान नोंदणीचे काम सुरू असून राजकीय पक्षाचे निवडणुकीच्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. या मतदारसंघातील सोलापूर जिल्ह्यातून तीन नावे चर्चेत आहेत. भाजपचे डॉक्टर बीपी रोंगे शिवसेना शिंदे गटाची मंगेश चिवटे, तर शिक्षक कृती समितीचे अध्यक्ष माजी आमदार दत्तात्रय सावंत, यांचाही समावेश आहे. उमेदवारी संपर्क अभियान व मोर्चे बांधणी सुरू केली आहे. पुणे विभागीय शिक्षक मतदार संघामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, या पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. या मतदारसंघांमध्ये ३१ तालुके ८५० शाळा सुमारे ५० हजार शिक्षक मतदार आहे. यामध्ये सर्वाधिक मतदार पुणे जिल्ह्यात असल्याची येथील राजकीय समीकरणाला विशेष महत्त्व आहे. महायुतीतून एकाच पक्षासाठी उमेदवारी एकाच मतदार संघासाठी दावीदारी वाढत असल्याचे उमेदवाराकडून दिसून येत आहे. उमेदवारीचा निर्णय हा कोणाच्या बाजूने होतो याची शिक्षकांना व मतदारसंघात उत्सुकता लागलेली आहे.

---

# कल्याणशेट्टी प्रशालेतील विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट:सोलापूर जिल्हा असोशिएशनच्या वतीने रविवार दि ०२/०८/२०२६ रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निवड स्पर्धेत सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कुमार सिद्धाराम भोजण्णा जमादार हा विद्यार्थी १४ वर्षाखालील वयोगटातून ६० मीटर धावणे, लांब उडी या दोन्ही स्पर्धेत जिल्ह्यात पहिला क्रमांक तसेच बॉक श्रो (गोळा फेक) स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला आहे, आता दि. २७ ते ३० ऑगस्ट २०२६ या दरम्यान होणाऱ्या डेवरण, जि.रत्नागिरी येथील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यास क्रीडा शिक्षक कुमार जाधव व श्रीशैल किणग या शिक्षकांनी मार्गदर्शन केले आहे.

यशस्वी खेळाडू विद्यार्थी व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष श्री सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभागप्रमुख रूपाली शहा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

---

# बेडर, बेरड, वाल्मिकी, रामोशी समाजाचे कुलदैवत श्री मरिआई देवीची ११ ऑगस्ट रोजी थंडी यात्रा महोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महेश गायकवाड/ अक्कलकोट : येथील बेडर, बेरड, वाल्मिकी, रामोशी समाजाचे कुलदैवत श्री मरिआई देवीचा मंगळवार दिनांक ११ ऑगस्ट २६ रोजी थंडी यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात आणि मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती बेडर बेरड आणि रामोशी व वाल्मिकी समाजाच्या पंच समितीने दिली.

श्री मरिआई देवस्थान बेडर गल्ली येथे हा यात्रा महोत्सव आयोजित करण्यात आला असून या निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

मंगळवार दिनांक ११ ऑगस्ट २६ रोजी सकाळी १०- ३० वाजता देवीची आरती आणि महापूजा मान्यवरांच्या हस्ते आणि त्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे. श्री.श्री. श्री. डॉ. प्रसन्ननंदजी पुरी महास्वामीजी कुलगुरू श्री महर्षी वाल्मिकी गुरुपीठ कर्नाटक राज्य, श्री. श्री. श्री. वर्धा नंदेश्वर महास्वामीजी गोल्लपल्ली आश्रम ता. निगसूर कर्नाटक राज्य,. श्री. नरसिंग नायक साहेब माजी कॅबिनेट मंत्री प्रदेश उपाध्यक्ष कर्नाटक राज्य आणि आमदार सुरपूर जिल्हा बेळगाव, अक्कलकोट चे आमदार श्री सचिनदादा कल्याणशेट्टी, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, तसेच श्री दौलत नाना शितोळे साहेब संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष बेडर बेरड वाल्मिकी रामोशी समाज, श्री राजाभाऊ सरवदे माजी राज्यमंत्री प्रदेश अध्यक्ष आर. पी.आय (आठवले गट ) श्री नंदकुमार माली पाटील, महापौर कलबुर्गी जिल्हा कर्नाटक. श्री महेश मालक इंगळे, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान चेअरमन व नगरसेवक अक्कलकोट , श्री अमोलराजे भोसले ,असंख्य स्वामी भक्तांचे अन्नदाते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष तसेच श्री उमेश उमापुरे, जिल्हा परिषद सदस्य लातूर, अक्कलकोट नगरपरिषद चे रॉयल नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी, माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा (मुतू) मालक खेडगी, श्री राजेंद्र टाकणे, उपविभागी पोलीस अधिकारी अक्कलकोट, श्री अविनाश पवार, पोलीस निरीक्षक, उत्तर पोलीस ठाणे उपनगराध्यक्ष बंटी भाऊ राठोड, उपनगराध्यक्ष, नगरसेवक ननू भाऊ कोरबू, नगरसेवक अविनाश मडीखांबे , नगरसेवक श्री नागराज कुंभार, नगरसेविका श्रीमती सुनिताताई सुनील भाऊ कामाटी, नगरसेवक श्री रोहिदास भाऊ खोमणे, नगरपरिषद जेजुरी सौ. सरिता ताई अनिल कुरले , नगरसेविका, अंकुश जाधव सर, बेडर, बेरड, वाल्मीकि,रामोशी, समाज महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री मरीअप्पा नायक , उत्तर . कर्नाटक वाल्मिकी नायक राज्य अध्यक्ष कर्नाटक राज्य, श्री श्रवणकुमार डी नायक, ग्रामीण होराट समिती संस्थापक अध्यक्ष कर्नाटक राज्य, श्री बाबुराव काका जमादार , बेडर, बेरड,वाल्मिकी, रामोशी,समाज महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, श्री गोविंद मंडले, ग्रामविकास अधिकारी आळंद, कर्नाटक राज्य, श्री सुधीर दादा नाईक , महाराष्ट्र प्रदेश युवक अध्यक्ष जय मल्हार क्रांती संघटना बेडर, बेरड, वाल्मिकी, रामोशी समाज श्री अशोक मम्माळे, जय मल्हार क्रांती संघटना धाराशिव जिल्हा अध्यक्ष, श्री. दशरथ जमादार बेडर, बेरड, वाल्मिकी, रामोशी, नायक, समाज बिदर जिल्हा अध्यक्ष कर्नाटक राज्य श्री शामराव काका दूरी बेडर, बेरड,वाल्मिकी,समाज सोलापूर जिल्हा अध्यक्ष यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत . या थंडी यात्रा महोत्सवा निमित्त भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात येणार असून या थंडी यात्रेत मोठ्या प्रमाणात पोतराज नाचविले जाणार आहेत तरी सदभक्तानी देवीचे आशीर्वाद देऊन महाप्रसाद घ्यावा असे आवाहन बेडर समाज अक्कलकोट पंच कमिटी आणि लक्ष्मण झंपले, शिवाजी माने, नागनाथ गुंजले, लक्ष्मण मिनगले, दत्ता माने, अनिल कुरले चट्टप्पा मिनगले, भीमा मिनगले, भीमा मलवे, महादेव अनगले, हनुमंत घोसले, महादेव घोसले, लखन झंपले, गोठू मलवे, धर्मा गुंजले, शेखर गुंजले, बसवराज घोसले, खाजाप्पा कुरले, राहुल माने, पवन अनगले, लकी कुरले, यांनी केले आहे.

---

**ज्येष्ठ महिलेचे दागिने व रोख रक्कम परत मिळवण्यात यश**

# अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्याचे डीबी पथकाची धडाकेबाज कामगिरी; २४ तासांत चोराच्या मुसक्या आवळल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : समर्थ नगर,अक्कलकोट येथील श्रीमती लक्ष्मीबाई रामचंद्र गड्डद (७७) या ज्येष्ठ महिलेच्या पर्समधून चोरीस गेलेली अर्ध्या तोळ्याची बोरमाळ आणि पेन्शनचे ₹१२,६०० अवघ्या २४ तासांत शोधून काढत अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने आरोपीला जेरबंद केले. पोलिसांच्या वेगवान, तांत्रिक आणि अचूक तपासामुळे गुन्ह्याचा अल्पावधीत उलगडा झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत पोलिसांच्या धडाकेबाज कामगिरीचे कौतुक केले आहे.



समर्थ नगर येथील लक्ष्मीबाई रामचंद्र गड्डद (वय ७७) या सकाळी फत्तेसिंह चौकातील गणेश पोतदार यांच्या के.पी. कॉम्प्युटर्स एसबीआय ग्राहक सेवा केंद्रात पेन्शन काढण्यासाठी गेल्या होत्या. त्यांनी सकाळी ११.२४ वाजता ₹१२,६०० काढून ते अर्ध्या तोळ्याच्या बोरमाळीसह पर्समध्ये ठेवले. बीपीचा त्रास झाल्याने काही वेळ त्या सेवा केंद्रात बसून राहिल्या आणि नंतर रिक्षाने घरी गेल्या. घरी पोहोचल्यानंतर मुलाला पैसे देण्यासाठी पर्स उघडली असता रोख रक्कम आणि बोरमाळ गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

घाबरलेल्या लक्ष्मीबाईंनी तातडीने ग्राहक सेवा केंद्र गाठून चौकशी केली. प्राथमिक पाहणीत कोणताही ठोस धागा हाती लागला नाही.परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेजही अस्पष्ट असल्याने तपासात अडचणी निर्माण झाल्या. मात्र डी.बी. पथकाने हार न मानता फत्तेसिंह चौकातील आयडीबीआय बँकेच्या सीसीटीव्ही फुटेजचा मागोवा घेतला. त्यामधील संशयास्पद हालचालींच्या आधारे पोलिसांनी गोपनीय माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि संशयितांची कसून चौकशी केली. अखेर आरोपीपर्यंत पोहोचत चोरीचा गुन्हा उघडकीस आणला.


या प्रकरणी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात प्रथम खबर क्रमांक ०४३६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ च्या कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीने चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली दागिना आणि पैसा हस्तगत केला. चोराला अटक करण्यात आली आहे.

ही उल्लेखनीय कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश पवार यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकाचे पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश अंगुले, पोलीस कॉन्स्टेबल श्रीकांत जवळगे, पोलीस कॉन्स्टेबल विकास पवार आणि पोलीस कॉन्स्टेबल केदारनाथ सुतार यांनी केली.पोलीस निरीक्षक अविनाश पवार यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या तक्रारीची तातडीने गांभीर्याने दखल घेत अवघ्या एका दिवसात गुन्ह्याचा उलगडा करून आरोपीला अटक केल्याने अक्कलकोट उत्तर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.आणी विशेष करुन डी.बी. पथकाचे पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश अंगुले व पोलीस कॉन्स्टेबल श्रीकांत जवळगे यांनी या तपासाची खरे मानकरी ठरले आहे. त्यानंतर श्रीमती लक्ष्मीबाई गड्डद यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र टाकणे व पोलीस निरीक्षक अविनाश पवार आणी डी.बी. पथकाचे पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश अंगुले, पोलीस कॉन्स्टेबल श्रीकांत जवळगे व उत्तर पोलिस ठाण्याचे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची कृतज्ञता व्यक्त केले.

---

# प्रा.गवळी यांना मातृशोक; ग.भा.कौशल्याबाई गवळी यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड / प्रतिनिधी : उगाव येथील कै. गं. भा. कौशल्याबाई आण्णा गवळी यांचे मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी रात्री १०.३१ वाजता राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून. त्या धार्मिक, कष्टाळू, व प्रेमळ स्वभावाच्या होत्या.

कै. कौशल्याबाई गवळी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या कुटुंबाचा संसार समर्थपणे सांभाळला. सन १९७२ च्या भीषण दुष्काळात राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत पालखेड डाव्या कालव्याच्या कामावर त्यांनी मेहनत करून कुटुंबाची आर्थिक जबाबदारी पेलली. त्यांच्या अथक परिश्रम, त्याग आणि संस्कारांमुळे आज त्यांचा परिवार उच्च शिक्षित व समाजात आदर्श म्हणून ओळखला जातो.

त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, नऊ नातू, पाच नाती, सात नातसुना, नऊ पतवंडे व सात पतवंडी असा मोठा परिवार आहे. त्यांच्या कुटुंबातील धाकटे चिरंजीव प्राचार्य म्हणून कार्यरत असून, नातवंडांमध्ये पाच अभियंते, दोन एम.टेक., एक एम.फार्म., नातींमध्ये दोन नर्सिंग पदवीधारक, तसेच नातसुनांमध्ये एक एम.बी.ए., तीन फार्मसी व दोन अभियंते आहेत. उच्च शिक्षणाची परंपरा आणि संस्कार हीच त्यांच्या जीवनकार्याची खरी ओळख ठरली.

गवळी परिवार हा वारकरी संप्रदायाचा पायीक असून, घरातील वडिलांनी सुरू केलेली पंढरीची वारी परंपरा मुलांनी आजही जपली आहे. मुलाने आषाढी पंढरपूर वारी करून आल्यानंतर अवघ्या तीन दिवसांनी गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिवशी या माऊलीने अखेरचा श्वास घेतला. त्यामुळे वारकरी भाविकांमध्येही त्यांच्या निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त करण्यात आली

त्यांच्या निधनाबद्दल परिसरातील सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# आकांक्षीत तालुका निती आयोगाच्या डेल्टा रँकिंग मध्ये अक्कलकोट तालुक्याची गरुड झेप; राज्यात तिसरा क्रमांक

## अक्कलकोटच्या यशाचे अनुकरण करा; देशातील पहिल्या पाचमध्ये येण्यासाठी प्रयत्न करावे : सीईओ कुशल जैन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर दि. ६ : नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, करमाळा आणि सांगोला या तीन तालुक्यांच्या सर्वांगीण विकासाचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय समन्वय व आढावा बैठक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निजी कक्षात संपन्न झाली. बैठकीत आकांक्षित तालुक्यांमधील विविध विकास निर्देशांकांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेत संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.




देशातील सर्वाधिक मागासलेल्या ५१३ तालुक्यांच्या तसेच महाराष्ट्रातील २७ तालुक्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाने आकांक्षित तालुका कार्यक्रम सुरू केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, करमाळा आणि सांगोला या तीन तालुक्यांचा या कार्यक्रमात समावेश आहे. नीती आयोगाच्या क्रमवारीत अक्कलकोट तालुका राज्यात तिसऱ्या क्रमांकावर असून, देशात ५२ वा क्रमांक असून सांगोला तालुकाही प्रगतीपथावर असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत आरोग्य, पोषण महिला बाल विकास, शिक्षण, कृषी व पर्यावरण, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास या क्षेत्रांतील विविध निर्देशांकांवर विशेष भर देण्यात येत आहे. जिल्ह्यातील आकांक्षित तालुक्यांच्या प्रगतीचे ३८ निर्देशांकांच्या आधारे नियमितपणे मूल्यमापन केले जात असून, बैठकीत प्रत्येक विभागाच्या कामगिरीचे सादरीकरण करण्यात आले.

आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, पाणीपुरवठा, ग्रामविकास तसेच अन्य संबंधित विभागांच्या कामकाजाचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. प्रलंबित बाबी तातडीने पूर्ण करून शासनाने निर्धारित केलेली उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

आकांक्षित तालुका कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून संयुक्तपणे कार्य करावे, तसेच विकासाच्या प्रत्येक निर्देशांकात ठोस प्रगती साधण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत, यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, अक्कलकोटचे गटविकास अधिकारी शंकर कवितके, करमाळ्याचे गटविकास अधिकारी अमित कदम, सांगोल्याचे सहगटविकास अधिकारी वसंत फुले, जिल्हास्तरीय संबंधित विषयांचे खातेप्रमुख, तालुका स्तरावरील सर्व विभागप्रमुख, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, पाणीपुरवठा, ग्रामविकास विभागांचे अधिकारी तसेच तालुका फेलो कर्मचारी उपस्थित होते.

अक्कलकोटची राज्यातील तिसऱ्या क्रमांकाची कामगिरी कायम राखत आणखी उंचावणे, तसेच करमाळा व सांगोला तालुक्यांच्या प्रगतीला गती देऊन आकांक्षित तालुका कार्यक्रमाच्या उद्दिष्टांची प्रभावी पूर्तता करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.

# उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त वागदरी येथे शालेय साहित्य व खाऊ वाटप























**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी) : अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त वागदरी येथे सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. युवा नेते शिवराज (मंत्री) पोमाजी व सुनील सावंत यांच्या पुढाकारातून वागदरी येथील कन्नड व मराठी माध्यमाच्या शाळा, उर्दू शाळा तसेच सर्व अंगणवाड्यांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून हा उपक्रम सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला. यावेळी उपस्थित शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसह उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

या प्रसंगी गोगावचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, महादेव सोनकवडे, शाम बाबर व सागर वामने यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे ही अत्यंत महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे. उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी यांनी नेहमीच सर्वसामान्य, गोरगरीब व वंचित घटकांच्या हितासाठी कार्य केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रेरणा देणारा असून, अशा सामाजिक उपक्रमांची परंपरा भविष्यातही कायम राहावी. सागर दादा यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि सामाजिक व राजकीय क्षेत्रात अधिक यश लाभो, हीच मनःपूर्वक वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचा आदर्श संदेश समाजापुढे ठेवण्यात आला.